CNR-MHYA120002252016

| | | |
|---|---|---|
| **दाखल दिनांक** | – | २८/०४/२०१६ |
| **नोंदणी दिनांक** | – | २८/०४/२०१६ |
| **निकाल दिनांक** | – | ०४/०७/२०२६ |
| **कालावधी** | – | वर्ष महिने दिवस<br>१० ०१ २६ |

**विद्यमान न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, महागाव, जि. यवतमाळ यांचे न्यायालय**

**(पिठासीन अधिकारी – एस. आर. जैन)**

**नि.फौ.ख.क्र. ७०/२०१६** **नि.क्र. ३७**

**फॉर्म–अ**

| | |
|---|---|
| **अभियोग** | महाराष्ट्र शासन तर्फे पोलीस स्टेशन अधिकारी, पो.स्टे. महागाव, ता. महागाव, जि. यवतमाळ. |
| **प्रतिनिधीत्व** | शासनातर्फे विद्वान विधीज्ञ श्री. पी.एस.बुटले |
| **आरोपी** | **अनिल श्रीराम नरवाडे,**<br>वयः ३६ वर्षे, व्यवसायः गोदाम किपर,<br>रा. महागाव, ता. महागाव, जि. यवतमाळ. |
| **प्रतिनिधीत्व** | आरोपी तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एस. बी. नरवाडे |

**फॉर्म–ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २७/०३/२०१५ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ३०/०५/२०१५ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | ०५/०४/२०२२ |
| पुरावा सुरु होण्याचा दिनांक | २८/०४/२०२३ |
| ज्या दिवशी निकाल राखुन ठेवला तो दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाची तारीख | ०४/०७/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | निरंक |

**फॉर्म–क**

| अ. | आरोपीचे | अटकेचा | जामीन | गुन्हा | निर्दोष/ | शिक्षा | फौ.प्र.सं. च्या कलम |
|---|---|---|---|---|---|---|---|

| क्र. | नाव | दिनांक | दिल्याचा दिनांक | | दोषी | ठोठावली | ४२८ च्या उद्देशाने अटकेत ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अनिल श्रीराम नरवाडे | १४/०३/ २०१६ | २१/०३/ २०१६ | कलम ४०९, ४२० भा.दं.वि. | निर्दोष | -- | -- |

## फॉर्म–ड

### फिर्यादी/बचाव पक्ष/न्यायालय/साक्षीदारांची यादी.

### (अ) अभियोग साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १ | प्रमोद अर्जुन जाधव **(नि.क्र.१९)** | साक्षीदार |
| २ | संतोष नारायण देशमुख **(नि.क्र.२०)** | साक्षीदार |
| ३ | कैलास मनोहरप्रसादर मिश्रा **(नि.क्र.२०क)** | फिर्यादी |

### (ब) बचाव पक्ष साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

### (क) न्यायालय साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| | निरंक | |

### फिर्यादी/बचावपक्ष/न्यायालय/निशाणी क्रमांक यादी.

### (अ) अभियोग नि.क्र. यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | पी१/पीडब्ल्यु३ | लेखी फिर्याद |

### (ब) बचावपक्ष मान्य केलेल्या दस्तऐवजांची यादी

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

**(क) बचावपक्ष नि.क्र. यादी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

**(ड) न्यायालय नि.क्र. यादी**

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | दोषारोप | **नि.क्र.२८** |
| २. | आरोपीची जबानी | **नि.क्र.२९** |
| ३. | फौ.प्र.सं.कलम ३१३(१)(ब) प्रमाणे आरोपीचे निवेदन | **नि.क्र.३४** |

**(इ) मुद्देमाल वस्तु.**

| अ.क्र. | मुद्देमाल वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | निरंक | |

## न्यायनिर्णय

## (दिनांक ०४ जुलै, २०२६ रोजी पारीत)

आरोपीच्या विरुध्द भारतीय दंड संहिता (यापुढे थोडक्यात ''भा.दं.वि'') चे **कलम ४०९ आणि ४२०** अन्वये संपरिक्षा चालविण्यात आली.

२. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, फिर्यादी श्री. कैलास मनोहरप्रसाद मिश्रा हे तालुका खरेदी विक्री शेतकी सहाकरी संस्था म., महागाव या संस्थेचे व्यवस्थापक असुन त्यांची संस्था शेतक-यासाठी योग्य किमतीमध्ये रासायनीक खत , बी बियाणे विकण्याचा व्यवसाय करते. त्याकरीता संस्थेचे महागाव येथे दुकान क्र.१२ व १३ हे

भाडयाने घेवुन त्यामध्ये त्यांच्या संस्थेने रासायनीक खत विक्रीचे व मशनरीचे शेतक–यांनी विक्री करण्यासाठी दुकान चालु केलेले आहे. त्या दुकानावर संस्थेने गोदाम किपर म्हणुन आरोपीची नेमणूक केली होती. संस्थेने आपला रासायनीक खताचा धंदा चालवण्यासाठी आरोपीच्या ताब्यात रुपये ७,७४,२५७/– चे रासायनीक खत विक्रीसाठी सोपवीले होते. असे असतांना आरोपीने ३,२०,६२३/– रुपयाचे संस्थेचे रासायनीक खत विक्री केली परंतु सदरची रक्कम आरोपीने संस्थेमध्ये जमा न करता परस्पर संस्थेची ३,२०,६२३/– रुपयाची अफरातफर करुन संस्थेची फसवणूक केली आहे. त्यामुळे, फिर्यादीने आरोपी विरोधात पोलीस स्टेशन, महागाव येथे लेखी तक्रार दिली.

**३.** पोलीस स्टेशन, महागाव येथे आरोपी विरुध्द अपराध क्रमांक १०७/२०१५ नुसार **कलम ४०९ आणि ४२०** नुसार गुन्हा दाखल करण्यात आला. तपास अधिकारी यांनी तपास करुन आरोपी विरुध्द **कलम ४०९ आणि ४२०** भा.दं.वि. नुसार दोषारोप पत्र दाखल केले.

**४.** आरोपी विरुध्द दोषारोपण तयार करण्यात आले व त्यावर आरोपीने गुन्हा कबुल नसल्याचे न्यायालयास कळविले. आरोपी विरुध्द अभियोगिक पुरावा आढळुन आल्याने न्यायालयाने आरोपीचे बयाण फौजदारी प्रक्रिया संहिताचे **कलम ३१३(१)(ब)** नुसार बयाण नोंदविले.

**५.** विचारार्थ मुद्दे आणि त्यावरील कारणमिमांसेसह दिलेला निष्कर्ष खालीलप्रमाणे देण्यात आला आहे.

| <u>अ.क्र.</u> | <u>मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, दिनांक २७/३/२०१५ रोजीपूर्वीपासुन महागाव, ता. महागाव येथे आरोपीने खरेदी विक्री शेतकी सहकारी संस्था, महागाव यांचे मुद्देमालाचा अपहार करुन संस्थेची फसवणुक करून न्यासभंग केला आणि त्यामुळे आरोपीने | **..नकारार्थी..** |

| | | |
|---|---|---|
| | भारतीय दंड विधानाचे **कलम ४०९** नुसार गुन्हा केला? | |
| २. | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वरिल ठिकाणी व वेळी आरोपीने फिर्यादी संस्थेच्या रासायनीक खताचे पोते परस्पर विक्री करुन रक्कम संस्थेकडे जमा केले नाही आणि त्यामुळे आरोपीने भारतीय दंड विधानाचे **कलम ४२०** नुसार गुन्हा केला? | **नाही.** |
| ३. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

६. अभियोगपक्षाने गुन्हा सिध्द करणेकरिता सा.क्र. १ नामे प्रमोद अर्जुन जाधव यांना **नि.क्र. १९** वर तपासले. सा.क्र. २ नामे संतोष नारायण देशमुख यांना **नि.क्र. २०** वर तपासले आणि सा.क्र. ३ नामे कैलास मनोहरप्रसाद मिश्रा यांना **नि.क्र. २०–क** वर तपासले. अभियोगपक्षास वारंवार संधी देवुन देखील ते इतर साक्षीदार हजर करण्यास असमर्थ राहिल्याने न्यायालयाने **नि.क्र. १** वर अभियोगपक्षाचा पुरावा बंद केला.

**<u>मुद्दा क्रमांक १ ते २ करिता –</u>**

७. प्रस्तूत प्रकरणातील मुद्दा क्रमांक १ व २ हे एकमेकांशी निगडीत असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांची चर्चा एकत्रीतरित्या करण्यात येत आहे.

८. सदरिल प्रकरणात प्रमोद जाधव (अ.सा.क्र.१) यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, ते आरोपीला ओळखतात. ते तक्रारदार याला ओळखतात. घटनेबाबत त्यांना काहीही माहीत नाही. त्याच्यासमक्ष कोणतीही घटना घडली नाही. पोलिसांनी त्याच्यासमक्ष काहीही जप्त केले नाही. जप्ती पंचनाम्यावर त्यांची सही आहे. त्यातील मजकुराची त्यांना माहिती नाही.

९. सदरिल प्रकरणात संतोष (अ.सा.क्र.२) यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, ते तक्रारदार व आरोपीस ओळखतात. ते सन २००५ पासून खरेदीविक्री संघ, महागाव येथे गोदामपाल म्हणुन कार्यरत आहे. सन २००७ मध्ये आरोपी हा खरेदीविक्री संघात लिपीक म्हणुन नौकरीस लागला. प्रस्तूत प्रकरणातील घटनेबाबत त्याला काहीही माहीत नाही. आरोपीने रासायनीक खताविषयी अपहार केला असे त्याच्यासमक्ष घडले नाही. पोलिसांनी त्यांचा जबाब नोंदवला नव्हता. सदर साक्षीदाराने त्यांच्या सरतपासात अभियोग पक्षास पुरक अशी साक्ष नोंदविलेली नाही. त्यामुळे, अभियोग पक्षाने त्याला फितूर घोषीत करुन उत्तरसुचक प्रश्न विचारले. परंतू, त्यातही अभियोग पक्षास मदत होईल अशी कोणतीही साक्ष सदर साक्षीदाराच्या मुखातून बाहेर आलेली नाही.

१०. कैलास (अ.सा.क्र.३) यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, ते आरोपीस ओळखतात. ते खरेदीविक्री संघाचे कर्मचारी होते. ते सन १९७८ ते २०१७ या कालावधीत महागाव तालुका खरेदीविक्री संघामध्ये कार्यरत होते. सन २०१५ मध्ये आरोपी मशनरी विभागाचा प्रमुख होते. दिनांक ३१/०३/२०१५ रोजी झालेल्या तपासणीमध्ये माल कमी जास्त आढळून आला त्यामूळे संस्थेने आरोपीला पैसे भरणा करण्याबाबत नोटीस दिली. आरोपीने त्याच्या ताब्यातील माल परस्पर विकुन संस्थेला भरणा केला नाही. आरोपीने संस्थेचे रुपये तीन लाख विस हजार सहाशे तेवीसचा अपहार केला म्हणुन त्याने पोलीस स्टेशन महागाव येथे आरोपी विरुध्द तक्रार नोंदवली. मूळ तक्रारवर त्याची सही असुन त्यास नि.क्र. पी१/पीडब्ल्यु३ देण्यात आली.

११. त्यांच्या उलटतपासात त्यांनी सांगितले की, व्यवस्थापकास संस्थेचे अध्यक्ष व संचालक यांच्या आदेशाचे पालन करावे लागते. संस्थेच्या दुकानाची ते मार्च महीण्यात तपासणी करत होते. संस्था माल खरेदी करत होती. आरोपीस विक्रीसाठी किती माल देण्यात आला याबाबतचा पुरावा त्यांनी पोलिसांना दिला नाही. संस्थेचे कर्मचारी हे संचालकाचे

जवळचे नातेवाईक आहेत. सन २०११ मध्ये नवीन संचालक मंडळ निवडुन आले होते. सन २०११ मध्ये संस्थेचे अध्यक्ष पाचकोरे हे होते.

१२. अभियोग पक्षाच्या वतीने दाखल करण्यात आलेल्या अभिलेखावरील पुराव्याचे व साक्षीदारांच्या साक्षपुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदरिल प्रकरणात एकुण ३ साक्षीदारांची साक्ष नोंदविली आहे. त्यातील सा.क्र. १ आणि २ यांनी आरोपींविरुद्ध कोणतेही कथन न करता अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. सा.क्र. ३ यांनी आपल्या सरतपासात सांगितले आहे की, आरोपी हा मशनरी विभागाचा प्रमुख आहे आणि त्यांनी संस्थेचे ३ लाख २० हजार ६२३ चा अपहार केला. परंतु, आरोपीने कश्याप्रकारे अपहार केला याबाबत कोणतीही स्पष्टता त्यांच्या पुराव्यात आली नाही. संस्थेचे खत खरेदी विक्रीचे काम आहे. आरोपीने कोणत्या खताची अपहार करुन नुकसान केले याबाबत कोणतेही कथन पुराव्यात आले नाही. आरोपीला कारणेदाखवा नोटीस देण्यात आली होती. परंतु, तश्या कोणत्याही नोटीसची प्रत अभिलेखावर दाखल करण्यात आली नाही. आरोपीविरुध्द त्यांनी संस्थेत त्याचा पदाचा दुरुपयोग करुन त्याच्या पदाचा गैरवापर करुन संस्थेचा विश्वासघात केल्याचा आरोपी आहे. परंतु, आरोपीने कोणत्या प्रकारे अफरातफरी करुन कोणत्या खताची विक्री करुन नुकसान केले याबाबत अभिलेखावर काही आले नाही.

१३. फिर्यादी आपल्या उलटतपसात सांगतात की, व्यवस्थापकास संस्थेचे अध्यक्ष व संचालक यांच्या आदेशाचे पालन करावे लागते. त्यांनी आपल्या उलटतपसात सांगितले आहे की, आरोपीकडे विक्रीसाठी कीती माल देण्यात आला होता याचा पुरावा त्यांनी पोलीसांना दिला नाही. त्यांनीच आपल्या पुराव्यात सांगितले की, संस्थेचे कर्मचारी हे संचालकाचे जवळचे नातेवाईक आहेत. मग संचालकाचे म्हणण्यानुसार फिर्यादीने आरोपीविरुध्द रिपोर्ट दिला असेल हि शंका नाकारता येत नाही. तसेच त्यांनी आपल्या उलटतपसात सांगितले की, आरोपीस किती माल त्यांनी विक्रीकरिता दिला याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे फिर्यादीने दिलेला रिपोर्ट यावर संशय निर्माण होतो.

१४. तसेच, अभियोग पक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपीने अफरातफरी करुन भासवून फिर्यादीची फसवणूक करण्याचा प्रयत्न केला ही बाब सिध्द करण्याकरीता कोणताही तोंडी

अथवा कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे, आरोपीने कश्याप्रकारे अफरातफरी केली आणि संस्थेची फसवणुक केली याबाबत न्यायालयासमक्ष दस्तावेज दाखल केले नाही आणि फिर्यादीच्या पुराव्यावरुन ती बाब सुध्दा दिसून येत नाही. या कारणावरुन आरोपीवर लावण्यात आलेले दोष सिध्द करण्याकरिता सबब पुरावा मिळुण आला नाही आणि त्यामुळे अभियोगपक्षाच्या कथनावर संशय निर्माण होतो.

**१५.** फौजदारी न्यायशास्त्राच्या संपूर्ण रचनेचा पाया असलेला मुलभूत सिध्दांत असा आहे की, गुन्ह्याच्या प्रत्येक आवश्यक घटकांचे दोषारोपण सिध्द करण्याची जबाबदारी सरकारी पक्षावत असते आणि आरोपी तोपर्यंत निर्दोष मानला जातो जोपर्यंत त्याच्यावरचा गुन्हा सर्व शंकांच्या पलीकडे सिध्द होत नाही. आरोपीविरुध्दचा दोषारोप सर्व शंका दूर करुन सिध्द केला पाहिजे आणि हेच स्पष्टपणे दर्शविते की, शंका असल्यास लाभ मिळण्याचा हक्क आहे. जेव्हा आरोपीविरुध्दचे साक्षपुरावे अशा स्वरुपाचे आहे की, न्यायालय दोषी किंवा निर्दोषतेबाबत निश्चित निर्णय घेवू शकत नाही तेव्हाच शंकेचा मुद्दा उपस्थित होतो. शंका आणि निश्चितता एकत्र अस्तीत्वात राहू शकत नाही. एकाची उपस्थिती दुसऱ्याची अनुपस्थिती दर्शवते.

**१६.** शंकेचा लाभ देण्याचा सिध्दांत हा भारतीय फौजदारी कायद्यातील एक मुलभूत घटना आहे जो कोणत्याही व्यक्तीला स्पष्ट आणि ठोस पुराव्यांशिवाय दोषी ठरवले जाणार नाही याची खात्री करतो. न्यायालयाने पुराव्याचे बारकाईने विश्लेषण केले पाहिजे आणि कोणतीही वाजवी शंका असल्यास ती आरोपीच्या बाजूने सोडविली पाहिजे. हा सिध्दांत केवळ आरोपीचे हक्क संरक्षीत करत नाही तर न्यायप्रक्रियेची पवित्रताही टिकवून ठेवतो. एकदंरीत परिस्थिती लक्षात घेता अभियोग पक्ष आरोपीविरुध्द तयार करण्यात आलेले दोषारोपण सबळ पुराव्याच्या अभावी निःसंशयपणे सिध्द करु शकला नाही.

**१७.** वाजवी शंका तेव्हाच निर्माण होते जेव्हा सादर केलेल्या पुराव्यांवरून दोन सारख्याच प्रमाणात शक्य वाटणाऱ्या व्याख्या करता येतात — एक आरोपीच्या दोषी

असल्यास पाठिंबा देणारी आणि दुसरी त्याच्या निर्दोषतेस पाठिंबा देणारी. जर अशी दुहेरी शक्यता अस्तित्वात असेल, तर आरोपीला शंकेचा लाभ मिळण्याचा हक्क असतो.

**१८.** एकदंरीत परिस्थिती लक्षात घेता अभियोग पक्ष आरोपी विरुध्द तयार करण्यात आलेले दोषारोपण सबळ पुराव्याच्या अभावी निःसंशयपणे सिध्द करु शकला नाही. करिता, मुद्दा क्र.१ व २ बाबत नकारार्थी निष्कर्ष नोंदवून मुद्दा क्र.३ बाबत खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) आरोपीची भा.दं.वि. **कलम ४०९ आणि ४२०** अन्वये शिक्षेस पात्र गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिताचे **कलम २४८(१)** नुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) आरोपीचे बंधपत्र व जामिनपत्र रद्दबातल करण्यात येतात.

३) आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे **कलम ४३७–अ** नुसार वैयक्तिक जातमुचलका रुपये १५,०००/– आणि त्याच रकमेचा जामिन भरुन द्यावा.

*(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला)*

SAHIL RAKESH JAIN
Digitally signed by SAHIL RAKESH JAIN
Date: 2026.07.04 17:34:33 +0530

ठिकाण – महागाव.
दिनांक – ०४/०७/२०२६

**(एस. आर. जैन)**
**(जे.ओ.कोड–एम.एच.०३२२९)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**महागाव.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment is same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | M.S.Deshmukh |
| Name of the Court | : | C.J.J.D. & J.M.F.C., Mahagaon |
| Date of Judgment | : | 04/07/2026 |
| Judgment signed by the presiding officer on | : | 04/07/2026 |
| Judgment uploaded on | : | 04/07/2026 |